# आखुड लोकांचा प्रदेश

**२०१० साली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन पन्नास वर्षं होतील. तेव्हा महाराष्ट्राची गौरवगीतं उच्चरवात म्हटली जातील. त्याची तयारी एव्हाना सुरूही झाली आहे. विविध क्षेत्रात महाराष्ट्र देशात 'नंबर वन'कसा आहे हे तर सतत सांगितलं जात असतंच. परंतु महाराष्ट्राचा ज्ञानेश्वर–तुकारामांपासून शिवाजी महाराजांपर्यंतचा, नि महात्मा फुले–बाबासाहेब आंबेडकर–विठ्ठल रामजी शिंदेंपासून भाऊराव पाटील–विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पर्यंतचा इतिहास पाहिला, तर महाराष्ट्राची गेली चाळीस–पंचेचाळीस वर्षे नाकर्तेपणात गेलेली दिसतात. ऐतिहासिक वारसा न पेलणं, खऱ्या मानबिंदूंना मखरात बसवून भुरट्यांनाच डोक्यावर घेणं आणि सर्वच क्षेत्रात मर्यादित कुवतीमुळे महाराष्ट्राचं वैचारिक–सामाजिक–सांस्कृतिक विश्व दिवाळखोरीत निघणं अशा गोष्टी या काळात घडलेल्या दिसतात. महाराष्ट्राच्या किरट्या अर्थव्यवस्थेमुळे अज्ञ मराठीजन भौतिक दारिद्र्यात अडकले तर शिकलासवरलेला सुदृढ मध्यमवर्ग आपल्यातील वैचारिक दारिद्र्यालाच कवटाळून बसला. या साऱ्यातून महाराष्ट्र हा एक आखुड लोकांचा प्रदेश बनला. त्यामुळे थिल्लर, भोंगळ, अर्वाच्य आणि उथळ व्यवहारच समाजमान्य बनले. परंतु गेल्या अर्धशतकात असं काही झालं आहे, हेही कुणाच्या गावी नाही.**

**संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवाच्या तुताऱ्या फुंकण्याआधी मराठी संस्कृतीचा उडालेला बोजवारा**

◆

**सुहास**
**पळशीकर**

◆

**म**राठीचं आणि महाराष्ट्राचं रडगाणं ही तशी काही नवी गोष्ट नाही. 'मराठी माणूस पंतप्रधान का होत नाही?', 'मराठी साहित्यिक (बिचारे) राष्ट्रीय कसोटीला का उतरत नाहीत?'– याच प्रश्नाचं बालिश, भाबडं रूप म्हणजे 'मराठीत साहित्याचं नोबेल का नाही?' 'मराठी सिनेमाला ऑस्कर का मिळत नाही?' 'मुंबईत मराठी माणूस मागे का पडतो?' 'पुण्यातसुद्धा परप्रांतीय मंडळी कशी घुसखोरी करतात?'... एकूण काय, तर मराठीवर आणि मराठी माणसांवर सगळीकडे नुसता अन्यायच अन्याय होतोय असा तक्रारीचा सूर वारंवार आळवला जातो. जुन्या बाळबोध कवितेत जसे 'गरीब बिचाऱ्या चिमणीला' सगळे छळायला टपलेले असतात, तशी मराठीची आणि मराठी माणसाची रडकथा आपली चालूच आहे.

काही माणसांना सारखी अशी भीती वाटत असते की, आजूबाजूचे सगळे त्यांच्याविरुद्ध कारस्थानं करीत आहेत आणि त्यांचा छळ होतोय. त्यावर उतारा म्हणून मग अशा व्यक्ती स्वतःला फार मोठं समजायला लागतात. आपल्या कर्तबगारीचा (वृथा) अहंकार बाळगून मनाशीच फुशारक्या मारायला लागतात. जर असं काही समाजाच्या पातळीवरही होत असेल, तर मराठी समाज या दुहेरी गंडाने पछाडलेला आहे, असं म्हणता येईल. खरंतर 'महाराष्ट्र' या नावातच आपल्या 'महा' असण्याचा (पोकळ) दावा दिसून येतो. 'आपल्याला तेवढा इतिहास आहे, बाकीच्या प्रांतांना फक्त भूगोल आहे', या खुळचट अहंकारातून सोय एवढीच झाली की, मराठी समाजाला इतरांचा इतिहास समजून घेण्याची गरज उरली नाही! (आणि फक्त आपल्यालाच इतिहास असल्यामुळे तो तरी कशाला माहीत असायला हवा?)

फुटकळ प्रतिकांमधून समाधान मानून घेण्याच्या वृत्तीमुळे छोट्या–छोट्या गोष्टी आपल्या समाजजीवनात अगदी घट्ट रुजून बसतात. उदाहरणार्थ, यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री झाले तेव्हा 'हिमालयाच्या रक्षणाला सह्याद्री धावल्याचं' वर्णन पाहा; किंवा अगदी अलीकडे मराठी व्यक्ती राष्ट्रपती बनल्याचं उदाहरण घ्या. अशा प्रसंगी मराठी उर केवढा भरून येतो! प्रतिभाताईंच्या निवडणुकीच्या वेळी तर आख्ख्या महाराष्ट्रातला सगळ्यात कट्टर मराठी उर इतका भरून आला की, त्या भावनोद्रेकात शिवसेना–भाजप युती फुटायची वेळ आली.

पण असे काही थोडे प्रसंग सोडले, तर आपल्या सभोवताली अन्याय शोधून काढून रडारड करण्यात मराठी बाणा अगदी पटाईत आहे. महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी गुजराती मंडळी, नंतर १९६० ते ७० च्या दरम्यान दाक्षिणात्य आणि आता उत्तर भारतीय, झालंच तर बांगलादेशीय अशा सगळ्यांचा आपल्याविरुद्ध कट असल्याचा मराठी समाजाचा ठाम विश्वास आहे. मराठी समाजाचं प्रतिनिधित्व करणारी मराठी वर्तमानपत्रं त्या कटाचा एकसारखा 'पुरावा' देत असतात. सारांश, भारतात महाराष्ट्राच्या वाट्याला अन्यायच येतो, अशी एकूण तक्रार असते.

दुसरी तक्रार तर फारच दर्दभरी आहे. ती मराठी भाषेच्या पीछेहाटीबद्दल असते. काही वर्षांपूर्वी कवी कुसुमाग्रजांनी मराठी भाषेच्या हाती भिक्षेचा कटोरा आल्याची हृदयद्रावक तक्रार केल्यापासून मराठी भाषेची 'ती' प्रतिमा म्हणजे मराठी कारुण्याचं अगदी अधिकृत निवेदनच बनलं आहे. बहुधा तेव्हापासूनच मराठीचा झेंडा अटकेपार लावण्यासाठी जागतिक मराठी परिषद भरवली जाते. इतकंच काय, २०१० साली महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त थेट अंतराळात वैश्विक मराठी परिषद भरवण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडे एव्हाना सादरही झाला आहे. तसंच,तोवर मराठी साहित्याला नोबेल पारितोषिक मिळालं नाही, तर प्रतिनोबेल सुरू करण्यासाठी मराठवाड्यातले सगळे बंद सहकारी साखर कारखाने एकत्र येऊन भक्कम पैसा उभा करणार आहेत. कारण अशा 'उपक्रमां'शिवाय मराठीला चैतन्य येणार नाही, दहावीला मराठीत अनुत्तीर्ण होणाऱ्यांचं प्रमाण कमी होणार नाही, मराठी माध्यमांच्या शाळा बहरणार नाहीत, मोबाईल फोन कंपन्यांचे प्रतिनिधी मराठी बोलू लागणार नाहीत...

हे सगळं होईल तेव्हा होवो. तूर्तास मात्र देशात महाराष्ट्र किरटा आणि महाराष्ट्रात मराठी किरटी अशी ही दुःखाची कहाणी आहे. या कहाणीवरचे छळगंडाचे आणि आत्मप्रौढीचे पापुद्रे काढून टाकले, तर काय दिसतं?

मुद्दलात आज जो महाराष्ट्र प्रदेश आहे, तो सगळा काही पूर्वापार एकत्र नव्हता. काही मराठीभाषक



मंडळी हैदराबाद राज्यात निजामाच्या राजवटीखाली होती. तो आताचा मराठवाडा. विदर्भाचा पूर्वभाग हा मध्यप्रांतात होता. १९५६ मधे हे सगळे मराठी प्रदेश एका राज्य सरकाराच्या अमलाखाली आले. म्हणजे अलीकडच्या इतिहासात मराठी प्रदेश एकत्र येण्याच्या या घटनेला २००६ साली पन्नास वर्षं पुरी झाली. पण गंमत म्हणजे एक इंग्रजी वर्तमानपत्र सोडलं, तर ही गोष्ट कोणाला 'बातमी' करण्याच्या लायकीची वाटली नाही.

तेव्हाचं – १९५६चं–मुंबई राज्य हे मराठी व गुजराती प्रदेशांचं मिळून बनलं होतं. निव्वळ महाराष्ट्राचा मंगल कलश वगैरे आला, तो १९६० साली. पण म्हणून १९५६ ची आठवणही होऊ नये? मराठीचं राजकारण करणाऱ्यांना जशी याची आठवण झाली नाही, तशीच नेत्यांच्या ३७ व्या वाढदिवसाच्या पुरवण्या काढणाऱ्या मराठी वर्तमानपत्रांनाही या घटनेचं काही वाटलं नाही. सरकार तर बोलूनचालून औपचारिक तारखाच पाळणार. त्यामुळे महाराष्ट्र सरकार चिडीचुप राहिलं, पण मराठी आणि महाराष्ट्र यांच्या नावाने वार्षिक गळे काढणारे साहित्यिक, मराठीचे प्राध्यापक आणि सराईत मराठीवादी, यातल्या कोणालाच या घटनेचं अप्रूप वाटू नये?

भारत स्वतंत्र झाला तिथून मोजलं, तर साठ आणि महाराष्ट्र राज्य झालं तिथून मोजलं, तर सत्तेचाळीस वर्षांचा हिशेब करायचा झाला तर या काळात महाराष्ट्राची कर्तबगारी काय आहे?

आपली इतिहासाची झोळी तशी काही अगदीच रिकामी नाही. संत वाङ्मय, वारकरी संप्रदायाचा वारसा, शिवाजी महाराज, सुधारणा चळवळ, महात्मा फुलेंचा वारसा, या काही ठळक बाबी झाल्या. विसाव्या शतकात टिळकांनी राष्ट्रवादाला लोकशाहीवादी कलाटणी दिली. विठ्ठल रामजी शिंद्यांनी जातीच्या राजकारणाला 'बहुजन'वादी वळण देण्याचा प्रयत्न केला, याच काळात मराठी ज्ञानकोशाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प एकहाती पार पाडण्यासाठी 'ज्ञानकोशकार' केतकर झटले; बाबासाहेब आंबेडकर तर नव–महाराष्ट्राची पहाट होतानाच्या काळातच धम्मप्रवेश करत होते. १९६० साली महाराष्ट्र राज्य झालं त्याच्या कितीतरी आधी भाऊराव पाटलांनी शिक्षणसंस्थांचं जाळं उभं केलं होतं आणि विठ्ठलराव विखे–पाटील यांनी सहकारी साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली होती. आता आव्हान होतं, ते हा सगळा वारसा देशभरात विस्तारण्याचं आणि इतिहासाच्या खांद्यावर उभं राहून वर्तमान उज्वल करण्याचं. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर सरकारी पातळीवर 'मराठी'साठी रीतसर प्रयत्न सुरू झाले. भाषा संचालनालय आलं, सरकारी मराठी तयार करण्याचं काम सुरू झालं, शालेय पाठ्यपुस्तकं तयार करण्यासाठी पाठ्यपुस्तक मंडळ आलं, विश्वकोशाचा प्रकल्प सुरू झाला, साहित्य–संस्कृती मंडळाची स्थापना झाली, नवी विद्यापीठं उभी राहिली, मराठी समाजाचं दैवत म्हणजे शिवाजी महाराज. त्यांचं चरित्र लिहिण्याचं काम सरकारी प्रोत्साहनाने सुरू झालं.

तरीही आपला वारसा, आपली भाषा आणि संस्कृती वगैरेंचं संवर्धन करण्याचं काम काही महाराष्ट्राला झेपलं नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीदरम्यानचा उत्साह आणि आशावाद प्रत्यक्षात आलाच नाही.

### मुंबईची भानगड

महाराष्ट्राच्या स्थापनेपाठोपाठ मराठी माणसांवरच्या अन्यायांचं रडगाणं सुरू झालं. आधी 'मार्मिक'ने आणि नंतर शिवसेनेने त्याला वाट करून दिली. महत्त्वाकांक्षा कसली होती? तर नोकरदार, कारकून, टंकलेखक बनण्याची. बरं, हे दुकान चाललं कसं? तर मुंबईत बसून मराठी संस्कृतीबद्दल चिंता वाहणाऱ्या बुद्धिजीवींच्या नैतिक पाठिंब्यामुळे. त्यामुळे झालं काय की, भांडवली विकासाच्या दुष्परिणामाला प्रादेशिक अभिमानाची झिलई प्राप्त झाली.

मुंबईबाहेरच्या महाराष्ट्राचा मागासलेपणा, तिथली बेकारी, दारिद्र्य यांपैकी कशाचाच विचार न होता मुंबई म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचं नाक बनलं. मग मराठी अस्मिता, संस्कृती वगैरे धष्टपुष्ट करण्याचं काम सोडून सगळे या मुंबई प्रश्नाभोवती काथ्याकूट करीत बसले.

पुन्हा या मुंबई प्रकरणातली गंमत म्हणजे महानगरीय वास्तवाबद्दलचं गाढ अज्ञान. मुंबई जणू अजूनही कोळ्यांचं बेटच आहे, अशा थाटात सगळी चर्चा. शहरं वाढतात तेव्हा काही गोष्टी या अपरिहार्यपणे घडतात. शहरांच्या सीमा आणि संस्कृती याची फेरआखणी होते. संमिश्रभाषक संस्कृती ही शहरांची खासियत बनते. महानगरांच्या आर्थिक झगमगाटात कोणतीही एकभाषक संस्कृती सोवळेपणाने शिल्लक राहात नाही, हा जगभराचा अनुभव आहे. महाराष्ट्रात मात्र मुंबईची धनसंपत्ती हवी, पण संमिश्र संस्कृती नको, असला वैचारिक भोंदूपणा पसरला आणि त्याने अवघ्या महाराष्ट्रीय सांस्कृतिक मानसाचा कब्जा केला.

मराठी पत्रकार, साहित्यिक, विचारवंत (हे तर मराठीत मुबलकच आहेत!), मराठीचे कैवारी, या सगळ्यांचं समाजशास्त्रीय आकलन एवढं आखूड होतं आणि सांस्कृतिक जाणिवा एवढ्या फुसक्या होत्या, की त्यांनी मुंबईतल्या मराठीवरच्या अन्यायांचं रडगाणं हे आख्ख्या महाराष्ट्राचं 'महाराष्ट्र गीत' करून टाकलं.

मुंबईतल्या गिरण्या यथावकाश बंद पडल्या. या गिरण्यांच्या भोंग्यांनी महाराष्ट्रभरच्या कामगारांना मुंबईकडे खेचलं होतं. ते भोंगे थांबले आणि जणू या कामगारांच्या आयुष्यांमधला आवाज थबकला. तेव्हा मराठीवाल्यांनी काय केलं? ज्यांनी मराठीच्या हिताचं सोल प्रोप्रायटरशिपमधे दुकान काढलं होतं, ते या काळात हिंदुहृदयाचे ठोके मोजत होते. त्यांना गिरणी कामगारांकडे बघायला फुरसत नव्हती, पण त्यांचे सांस्कृतिक–भावनिक साथीदार, मराठीसाठी धाय मोकलून रडणारे, यातल्या कुणालाच मराठी माणसाच्या या हकालपट्टीची खंत वाटली नाही. अस्सल मराठी शासनकर्त्यांनी गिरण्यांच्या मृत्युचा तेरावा गिरणीमालकांच्या ताटात मेजवानी मारून साजरा केला आणि मराठी माणसांच्या दुर्दशेचं रडगाणं आळवायला पुन्हा सगळे आपले सज्ज झाले.



मुंबईबद्दल जरा विस्ताराने बोलण्याचं कारण दुहेरी आहे. एकतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 'मुंबई' हा मुद्दा मध्यवर्ती होता. महाराष्ट्राला मुंबई मिळणं हा त्या चळवळीच्या भावनिकतेमधला सगळ्यात ज्वालाग्राही मुद्दा बनला होता. आणि मुंबई मिळणं म्हणजे आपली अस्मिता भरून पावणं असं जणू समीकरण झालं होतं. या अर्थाने मराठी अस्मितेशी मुंबईचा मुद्दा जोडला गेला होता. दुसरं म्हणजे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यापासून एकूण मराठी भाषा, मराठी माणूस वगैरेंची जी चर्चा झाली तिच्यात मुंबईतल्या मराठी माणसांबद्दलची चर्चा नेहमीच महत्त्वाची राहिली. 'मुंबई महाराष्ट्रात आली, पण मुंबईत महाराष्ट्र कुठे आहे?' या प्रश्नातून मुंबईचं या संदर्भातलं महत्त्व व्यक्त होतं.

आता जसजशी महाराष्ट्रातली इतर शहरं वाढू लागली, तसतसं तिथे 'स्थानिक आणि परके' असं विभाजन मानणाऱ्या संघटना आकार घेऊ लागल्या आहेत. शिवाय या मुद्यावर लोक संघटित करण्यासाठी गेल्या ८–१० वर्षांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षही पुढे सरसावला आहे. हा खरंतर 'महाराष्ट्र'वादी पक्षच म्हणायचा, कारण मराठी माणसाला पंतप्रधान करायला तो फार उत्सुक आहे. शिवाय एकीकडे बहुजन समाजाच्या मराठी स्वाभिमानाला जमेल तसं खतपाणी घालण्यात हा पक्ष पुढे असतो. त्यामुळे खुद्द मराठी समाजातच आपसात मराठी इतिहास व महाराष्ट्राची प्रतीकं यांच्याबद्दलच्या मतभिन्नतेमधून 'मराठी' असणं म्हणजे काय, याच्याबद्दल आणखी गोंधळ उडायला लागलेला दिसतो.

### इतिहास : भाबडेपणा आणि विपर्यास

मराठी समाज आपल्या ऐतिहासिक संचिताला कसा सामोरा जातो, मराठी असणं म्हणजे तो काय मानतो, हे पाहण्यासारखं आहे. एकतर आपल्यावर वर्तमानाचा आणि नजिकच्या भूतकाळाचा प्रभाव इतका असतो की, त्यापायी इतिहासाकडे वळायला आपल्याला फुरसतच होत नाही. महाराष्ट्राचे मानबिंदू कोणते असं जर लोकांना विचारलं, तर अनेक वर्तमान उत्सवमूर्तींचा त्या यादीत नंबर लागेल. कारण प्रतिशिवाजी आणि प्रतिज्ञानेश्वर यांनीच आपले डोळे एवढे दिपून जातात की, आणखी मागे बघणंच शक्य होत नाही. अगदी साहित्यिक वगैरे विचारले, तरी लोक पुलंपाशी थांबतील. फारच भावुक असतील, तर कदाचित कुसुमाग्रज. हे दोघंही महाराष्ट्राच्या स्मरणरंजक भावुकतेचं प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे ते माहीत असतात. त्या मानाने पेंडसे–करंदीकर अज्ञातच. तेंडुलकर किंवा नेमाडे यांचे निदान स्वतःचे फॅन क्लब तरी आहेत. बाकी मर्ढेकर किंवा त्यापूर्वीचं फारसं खुद्द मराठीच्या विद्यार्थ्यांनाही जेमतेमच माहीत असतं, मग एकूण 'रसिक' मराठी समाजात त्यांना जागा नसणार हे उघडच आहे.

मधला एक कालखंड सोडला, तर वारकरी संप्रदायाबद्दल कौतुकानं बोललं जातं. पण दहा–बारा वर्षांपूर्वी 'युनिक फीचर्स'ने वारकरी संप्रदायाच्या अनुयायांची सामाजिक झडती घेतली, तेव्हा सगळे चिडीचुप राहिले होते. बाकी संतांबद्दल वगैरे



बरंच बोललं जातं, पण जिल्ह्या–जिल्ह्यांत आणि प्रत्येक तालुक्यात इतके स्वयंप्रज्ञ संत असतात की, त्यांच्यापुढे नामदेव–तुकाराम झाकोळून गेले नाही तरच नवल.

आणि अगदी नामदेव–तुकाराम माहीत असले, तरी ती आपली नावापुरती ओळख. किंवा प्रतीकाविषयी असणारा अभिमान. कोणत्याही प्रतीकाला ओरखडा उमटवणारं काही घडलं, तर हा अभिमान जागा होतो. प्रश्नपत्रिकेत तुकारामांविषयी आलेल्या आक्षेपार्ह उताऱ्याच्या प्रसंगी हे दिसलंच. पण अधिक्षेपाच्या ओरखड्यापेक्षा उपेक्षेमुळे होणारं नुकसान जास्त असतं. कारण त्यामुळे आपलं आत्मभान जास्त संकुचित आणि बधिर होतं.

उदाहरणार्थ, विठ्ठल रामजी शिंदे हे ब्राह्मणेतर चळवळीतलं एक महत्त्वाचं व्यक्तिमत्त्व. जातीचा प्रश्न आणि आर्थिक प्रश्न या दोहोंचं भान ठेवावं, हा त्यांचा आग्रह महात्मा फुल्यांचा वारसा पुढे चालवतो. पण महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीला, पुरोगाम्यांना, जातिप्रश्नांवर लढणाऱ्यांना–सर्वांनाच, विठ्ठल रामजींचं जवळपास विस्मरणच होतं. किंवा समाजवाद्यांचं पाहा. त्यांना एकतर आचार्य जावडेकरांचं विस्मरण होतं किंवा महत्त्व समजत नाही. महाराष्ट्रातल्या समाजवाद्यांनी (फारसा अभ्यास न करताच) साने गुरुजींना आपलं कुलदैवत करून टाकलं आणि जावडेकर अडगळीत गेले. जावडेकरांनी गांधीवादाची विधायक चिकित्सा करून गांधीविचार आणि मार्क्सवाद यांचा एकत्रित विचार केला. तेच समाजवाद्यांना आवडलं नाही की ही गुंतागुंत समजून घेणं त्यांना अवघड वाटलं? परिणामी, आज महाराष्ट्राला जावडेकर माहीत नाहीत. तीच गत दि.के.बेडेकरांची. दि.के. बेडेकर नावाचा विद्वान, चिकित्सक अभ्यासक होऊन गेला, हे महाराष्ट्राला कशाला माहीत असणार?

आणि जी प्रतीकं मानबिंदू म्हणून महाराष्ट्र मिरवतो, त्यांच्या मोठेपणाचं तरी आपल्याला कितपत आकलन झालंय? शिवाजी महाराजांचंच उदाहरण घ्या. महाराष्ट्राने शिवाजी महाराजांचं मोठेपण कसं जपलंय? रेल्वे टर्मिनस आणि विमानतळाला नाव देऊन महाराजांचं स्मरण महाराष्ट्राने केलं. पण 'शिवाजी' हे प्रतीक धार्मिक असहिष्णुता आणि जातींची आक्रमकता यांच्या राजकारणासाठी वापरून आपण शिवाजी महाराजांच्या वारशाशी प्रतारणा केली. शंभरहून जास्त वर्षांपूर्वी जोतिराव फुल्यांनी 'कुळवाडी भूषण' म्हणून गौरवून महाराजांच्या ऐतिहासिक मोठेपणावर नेमकं बोट ठेवलं. पण जोतिरावकृत शिवाजीच्या पोवाड्यापेक्षा महाराष्ट्राला प्रिय झाली, ती पुरंदऱ्यांची शाहिरी! सगळं गोडगोड नाटकी करून टाकण्याच्या हौसेपायी 'जाणता राजा'चे प्रयोग इतके चालतात की, पुढच्या काळात बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या फोटोलाच लोक शिवाजी समजू लागतील.

फुल्यांच्या पोवाड्यानंतर शंभर वर्षं उलटूनसुद्धा आजही शिवाजी महाराज म्हटलं की, क्षत्रियत्व, आक्रमक हिंदुत्व याच प्रतिमा जनमानसांत उभ्या राहतात. आपल्या ऐतिहासिक संचिताचा हा विपर्यास कसा झाला, याचा शोध मराठी समाजाने घेण्याची गरज आहे.

शिवकाळ तरी तीन–साडेतीनशे वर्षांपूर्वीचा. त्यामानाने महात्मा फुले तर एकोणिसाव्या शतकातले–म्हणजे अगदी अलीकडचे. त्यांचे पांग महाराष्ट्राने कसे फेडले? प्रामाणिकपणे सांगायचं, तर महाराष्ट्राला 'फुले मोठे का' हे कळलेलंच नाही. त्यामुळे त्यांच्या नावाने कृषी विद्यापीठ काढण्याची घोडचूक झाली. त्यावर कळस म्हणून ओबीसी महामंडळ त्यांच्या नावावर करून टाकण्याचा आचरटपणा केला गेला. या झाल्या सरकारी चुका. पण जोतिराव फुल्यांवर कॉपीराइट घेतलेल्यांनी तरी काय केलं, हेही पाहायला हवंच. विशेषतः गेल्या पंधरा–वीस वर्षांत महात्मा फुल्यांचा वारसा सांगत महाराष्ट्रात नवा ब्राह्मणेतरवाद पसरवण्याचे प्रयत्न झाले, हे विसरून चालणार नाही.

आपलं 'स्वत्व' नेमकं कशात आहे, आपण ज्या प्रतीकांची पूजा करतो त्यांचा नेमका अर्थ काय, हे न कळल्यामुळे आपला वारसा वृद्धिंगत करण्यात महाराष्ट्राला अपयश येणं स्वाभाविकच होतं. ज्या समाजाला अस्सल वारसा झेपत नाही, तिथे भुरट्यांना भाव आला तर त्यात नवल ते काय?

**भाषणांचा भडिमार**

मराठीचे प्राध्यापक हळूहळू करीत समीक्षक बनतात (आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला नंबरात उभे राहतात), तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक तर थेट तत्त्वज्ञ म्हणूनच ओळखले जातात. वर्तमानपत्रात लेख लिहिले की माणूस 'विचारवंत' होतो. अशा समाजात चलाख भाषणबाजांना भलतीच 'डिमांड' असते. हे म्हणजे फिरते विचारवंतच म्हणा ना! या डिमांड–सप्लायच्या चक्रातून भले भले सुटले नाहीत. असं म्हणतात की, दत्तो वामनांचं शिवचरित्र लिहून न होण्याचं कारण सभांची अध्यक्षपदं हे होतं. या व्यापातून तर्कतीर्थही सुटले नव्हते. या भाषणबाजीला डौलदार व्यावसायिक रूप दिलं ते शिवाजीराव भोसलेंनी. शिवाजी महाराजांनी जेवढा महाराष्ट्र घोड्यावरून फिरला नसेल एवढा या शिवाजीरावांनी पादाक्रांत केला आहे.

फावल्या वेळेत कानावर हरिनाम संकीर्तन पडावं म्हणून पुराण–प्रवचनाला जाण्याच्या परंपरेशी या भाषणप्रेमाचा काही संबंध आहे का, हे खरंतर बघायला हवं. की फार काही लिहायला वगैरे लागू नये म्हणून लोकांना भाषण करायला आवडतं कोणास ठाऊक! पण भाषणं ऐकायची हौस असलेले कानसेन, भाषणं ठेवायचा उद्योग असलेले कार्यकर्ते आणि भाषणं करायला फुरफुरणारे वक्ते अशी अवघी भाषणबाजीची मांदियाळी महाराष्ट्रात नांदताना दिसते.

पुन्हा भाषणा–भाषणांत फरक असतो. काहीजण भाषणांची सुपारी घेऊन, येईल त्या विषयावर 'अभ्यासपूर्ण' भाषण द्यायला तयार असतात. ते अभ्यासू वक्ते म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रभरच्या व्याख्यानमाला या त्यांच्या पोशिंद्या. गणपतीत किंवा वसंत व्याख्यानमालांच्या काळात या लोकांचं बुकींग फार आधी करावं लागतं. यांना कोणताच विषय वर्ज्य नसतो. आदल्या दिवशी 'ढासळती नीतिमूल्ये' या विषयावर तर दुसऱ्या दिवशी 'एडस्‌चा धोका' यांवर ते बोलतात. विनोबा आणि रामदास या दोघांवरही भरभरून बोलणारे राम शेवाळकर हे या पंथातलेच. दुसरा प्रकार जरा मर्यादित वर्तुळात प्रचलित असतो. हे वक्ते भलतेच हौशी असतात आणि त्यांचा एक खास श्रोतृवर्ग असतो. गाण्याला जशा माना डोलावतात किंवा शायरीमध्ये जसे 'वाहव्वा'चे सहजोद्‌गार येतात, तसं यांच्या भाषणात चालतं. श्रोता जणू वाटच पाहात असतो, की वक्ता कधी 'जागा' घेतो आणि आपण कधी मान डोलावून दाद देतो! या हौशी भाषणबाजांमध्ये आणखी एक उपप्रकार असतो. तो म्हणजे खास वक्त्याच्या भक्तिभावनेत बुडालेल्या श्रोत्यांसाठीच्या भाषणांचा. असे भक्त श्रोते खास–खास वक्त्यांचं रेकॉर्डींग करतात (आणि बहुतेक रोज सकाळी मन साफ करण्यासाठी ते ऐकतात.) उदाहरणार्थ, समजा अभय बंग किंवा प्रकाश आमटे यांचं मुलाखत–स्वगत उपदेशवजा भाषण असेल तर त्याची कॅसेट करायची! व्हीडीओ काढली तर संयोजक आरामात खर्च वसूल करू शकतात एवढी डिमांड असते! (आणि 'राशिचक्रा'वरच्या एकपात्रीपेक्षा हे बरंच बरं म्हणायचं.)

काही भाषणबाज तर व्याख्यानाऐवजी आख्यानच लावतात. तहानभूक हरपून संवादाचा हा एकेरी झरा वाहात राहतो. यांचा स्वतःचा शिष्यवर्ग असतो. बाकीच्यांना म्हटलं तर उपद्रव नाही. माना डोलावणाऱ्यांची फौज यातून तयार होते, ही मात्र चिंतेची बाब. पुरोगाम्यांमध्ये ही मौखिक परंपरा भलतीच प्रचलित आहे. कुणाचा धबधबा, तर कुणाची संथ वाहते कृष्णामाई.

सरतेशेवटी, हल्ली काही बहाद्दर भाषणबाज तर पैसे लावून स्वतःची भाषणं चालवतात. आर्यचाणक्य अविनाशदादा धर्माधिकारी हे या धाडसी लोकांपैकी एक. त्यांचंही बरोबर आहे. अस्खलित भाषेत चुटके, विनोद, कविता आणि वर जीके (म्हणजे 'सामान्य'ज्ञान), एवढं सगळं द्यायचं, तर तिकीट लावायला काय हरकत आहे?

भाषणांबद्दल एवढं लिहिण्याचं कारण म्हणजे (पोटदुखी हे तर आहेच!) हे वाचून तरी भाषणांची येणारी निमंत्रणं ओसरतील. पण या अशा बोलघेवडेपणातून थिल्लरपणाची संस्कृती प्रचलित होते; दोन घटकांची करमणूक वैचारिकतेचं रूप पांघरते आणि उथळ पाणी हेच धबधबा म्हणून समाजात मान्यता पावतं.

भलेभले अभ्यासकही भाषण करतात तेव्हाच आणि तेवढीच मान्यता पावतात. य.दि.फडके यांचं इतिहास संशोधन किंवा त्यांची ग्रंथसंपदा यांचं महाराष्ट्राला फारसं सोयरसुतक नाही. ते वयोमानपरत्वे भाषणं करण्याचं टाळायला लागले, तसा महाराष्ट्राला त्यांचा विसर पडू लागला. कम्युनिस्ट चळवळीतून आलेल्या कॉ.शरद पाटलांनी तत्त्वज्ञान, संस्कृत भाषा, इत्यादींचा गाढ अभ्यास करून नवी अभ्यासपद्धती मांडली. पण त्यांच्या लिखाणापेक्षा भाषणांनाच दाद जास्त मिळत असे. त्यांच्या आक्रमक भाषणांचा प्रभाव एवढा जबरदस्त की, त्यांच्या भाषणातले अवघड–अवघड शब्दप्रयोग करीत भाषणांची खैरात करणारे कितीतरी ज्वालाग्रही भाषणबाज ठिकठिकाणी निर्माण




झाले. एकूण काय, तर ‘लिहावे परि भाषणरूपे गाजावे’ असा महाराष्ट्राचा खाक्या आहे. फारशी भाषणं वगैरे न करणारे रा.चिं.ढेरे महाराष्ट्राला कितपत परिचित आहेत, हा संशोधनाचाच विषय ठरावा; मग त्यांनी ढीगभर संशोधन का केलेलं असेना.

भाषणांचीच कसोटी लावायची, तर भटकर–माशेलकर–गोवारीकर हे नारळीकरांपेक्षा थोरच असा सगळा मामला आहे.

इतिहासाचार्य राजवाडे हे महाराष्ट्राचे एक अग्रगण्य संशोधक. अर्थातच ते आताच्या लोकप्रिय इतिहासाच्या आणि ऐतिहासिक कादंबरीच्या जमान्यात फारसे कुणाला माहीत नसतात. तर त्यांनी महाराष्ट्रातल्या ‘शंभर कर्त्या व्यक्तींची’ यादी करायला घेतली होती. आज जर आपण २००० हे साल आधारभूत मानून त्याच्या अवतीभोवतीच्या शंभर कर्त्या मराठी व्यक्तींची यादी करायला घेतली, तर काय होईल? एकतर त्यात अनेक वाचावीर येतील आणि निव्वळ मौखिक परंपरावाले–म्हणजे भाषणं करणारे– वगळले तर ती यादी शंभरापर्यंत कशी न्यायची, असा प्रश्न पडेल अशी शक्यता जास्त आहे.

**उथळ सामाजिक विश्व**

भाषणांच्या हौसेमधून जो उथळपणा व्यक्त होतो, तो महाराष्ट्राच्या एकूणच सामाजिक–सांस्कृतिक विश्वाचा स्थायीभाव होऊ लागला आहे. सार्वजनिक संस्था, शिक्षणसंस्था, वर्तमानपत्रं, सहकाराची चळवळ या सगळ्या क्षेत्रांमध्ये पुन्हा–पुन्हा हाच बथ्थड उथळपणा आपल्याला सामोरा येतो. जवळपास प्रत्येक शहरात जुन्या सार्वजनिक संस्था एकतर मोडकळीला आलेल्या आहेत किंवा निष्क्रीय बनल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात धनंजयराव गाडगीळ यांनी अर्थशास्त्रात संशोधन करणारी गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था सुरू केली. तिच्या कामाची दखल देशभर आणि परदेशांतही घेतली गेली. आता संस्था कशीबशी चालू  आहे आणि संस्थाचालकांचा एक डोळा जमीन व्यापारी कारणासाठी वापरता येईल का, याच्यावर आहे की काय असं म्हटलं जातं. भारत सेवक संघ आणि गोखले अर्थशास्त्र संस्था यांच्यापुरतंच हे झालेलं आहे, असं नाही. मोडकळीला आलेलं डेक्कन कॉलेज, भांडणांनी ग्रासलेलं भारत इतिहास संशोधन मंदिर, हतोत्साह झालेली वाईची प्राज्ञ पाठशाळा, रुकुटुकू चाललेलं धुळ्याचं राजवाडे संशोधन मंदिर, अडगळीत गेलेलं अमळनेरचं तत्त्वज्ञान केंद्र, अशी कितीतरी उदाहरणं महाराष्ट्राच्या संस्थात्मक अपयशाची खूण मिरवत आहेत. पडक्या इमारतींसाठी महाराष्ट्र सरकारचं जसं एक मंडळ आहे, तसं या मोडकळीला आलेल्या संस्थांच्या डागडुजीसाठी एक मंडळ नेमलं तर चार–दोन वयस्कर विचारवंतांची त्याच्यावर सोय तरी लागेल!

असलेल्या संस्था आपल्याला वृद्धिंगत करता येत नाहीतच, पण आणखी विशेष म्हणजे गेल्या पाच–पन्नास वर्षांत संशोधन वगैरेला वाहिलेल्या किती संस्था आपण काढू शकलो, हेसुद्धा पाहण्यासारखं आहे. समाज, इतिहास, भाषा यांपैकी कशाच्याच अभ्यासासाठी संस्थात्मक पाठबळ उभं राहात नसेल, तर त्या समाजाचं आत्मभान संकुचित राहणार, हे काय वेगळं सांगायला पाहिजे?

पण फक्त संशोधनपर संस्थाच नाहीत, असं नाही. एकूणही कागदावरच्या संस्थाच जास्त. ज्या कागदावरून उठून समाजात अस्तित्वात आल्या, त्यांच्यापैकी बहुतेक संस्था वर म्हटल्याप्रमाणे व्याख्यानमाला चालवतात आणि रांगोळी व मेंदीच्या स्पर्धा घेतात. नाही म्हणायला सार्वजनिक संस्थांचा आणखी एक उपक्रम असतो, तो म्हणजे ‘पुरस्कार’ देण्याचा. लोकप्रिय कलाकार, वयस्कर प्रतिष्ठित वगैरेंना पुरस्कार दिला की, संस्था नावारूपाला येते. (त्या दृष्टीने वर्तमानपत्रांचे संपादक पुरस्कारांना फार योग्य असतात.) गावाचं–शहराचं नाव आणि त्याच्यापुढे ‘भूषण’ लावायचं की झाला पुरस्कार. महाराष्ट्रातले सगळे पुरस्कार शोधून त्यांची यादी करणाऱ्याला खरंतर महापुरस्कार द्यायला हवा. अशी यादी मिळाली म्हणजे (आमच्यासारख्या) पुरस्कार–वंचितांची सोय होऊन जाईल. यावर्षी कोणकोणत्या पुरस्कारांसाठी प्रयत्न करायचा ते पद्धतशीरपणे ठरवता येईल. महाराष्ट्रात असे अनेक पुरस्कारबहाद्दर आहेत, ज्यांना एकाच वर्षी दोन परस्परविरोधी छावण्यांचे पुरस्कार मिळतात! एकीकडे एखाद्या ‘पुरोगामी’संस्थेचा पुरस्कार घ्यायचा आणि दुसरीकडे वनवासी कल्याण आश्रम किंवा समरसता मंच वगैरेंशी समरस व्हायचं. देणाऱ्याला, घेणाऱ्याला आणि बाकीच्यांनाही काही वावगं वाटत नाही ही खरी गंमत!

काही पुरस्कारांमध्ये भक्कम रक्कम असते, काहींत प्रतिष्ठा असते, बऱ्याच पुरस्कारांमध्ये यांपैकी काहीच नसतं, पण घरी स्मृतिचिन्ह तर येतं! सरकारी पुरस्कार आणि खाजगी संस्थांचे पुरस्कार दोन्ही मुबलक असतात. पुस्तकांसाठी पुरस्कार, महान कार्यासाठी पुरस्कार, महान असण्याबद्दल पुरस्कार, नेमून दिलेलं काम केल्याबद्दल पुरस्कार, नेमून दिलेलं काम न करता समाजसेवा केल्याबद्दल पुरस्कार, अशी नुसती लयलूट असते. आणि समाज एवढा प्रेमळ की, पुरस्काराचा पैसा कुठून आला, परीक्षक मंडळ कोणतं होतं, याची पूस–तपास काही नाही. ज्यांचा हुकतो तेही पुढच्या वर्षी मिळेल या आशेने चूप बसतात.

सार्वजनिक संस्था पुरस्कार देण्याचं तरी काम करतात. शिक्षणसंस्थांची परिस्थिती त्याहून वाईट आहे. भाऊराव पाटलांचा वारसा वगैरे आपण सांगतो, पण प्रत्यक्षात जिल्ह्या–जिल्ह्यांत शिक्षणमहर्षी उभे राहिले आणि आपापल्या स्थानिक राजकारणाला बळ देण्यासाठी त्यांनी शिक्षणसंस्थांचं लहानमोठं जाळं उभं केलं. त्यातल्या किती ठिकाणी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्यासुद्धा खाऊन टाकल्या जातात आणि प्राध्यापक होऊ पाहणाऱ्यांकडून किती देणग्या मागितल्या जातात, याबद्दल अवघ्या महाराष्ट्रात काही बोललं जात नाही. सगळी विद्यापीठं संस्थाचालकांच्या दडपणाखाली चालतात. गुणवत्तेबद्दलची संपूर्ण बेदरकारी आणि भ्रष्टाचार याच्यावर सगळं उच्च शिक्षण उभं आहे. त्यामुळे गावोगावी महाविद्यालयं आहेत, पण शिक्षणाचा पत्ता नाही



अशी स्थिती आहे. नोकरीला लायक नसलेले पदवीधर (अनएम्प्लॉएबल ग्रॅज्युएटस्)पुरवणारी प्रौढांची पाळणाघरं या पलीकडे महाविद्यालयांना महत्त्व नाही.

शिक्षणसंस्था ज्या जिल्ह्यातली किंवा तालुक्यातली असेल तिथल्याच पदवीधरांना नोकरीत प्राधान्य देण्याची रीत असते. ज्या जातीचं त्या संस्थेवर वर्चस्व असेल, त्या जातीच्या प्राध्यापकांना नोकरीत ठेवण्याकडे कल असतो. अशा प्रकारे आपापली माणसं नेमून चालवल्या जाणाऱ्या शिक्षणसंस्थांचं कौतुक करताना मात्र ‘बहुजन समाजा’साठी शिक्षणाची दारं यांनी खुली केली, असं म्हणण्याची पद्धत आहे.

गुणवत्ता, पुस्तकं याच्याबद्दल बोलायला लागलं, की तमाम महाराष्ट्रातून कळवळून सांगितलं जातं की, ग्रामीण भागातल्या गरीब विद्यार्थ्यांना पुस्तकं वाचायला झेपणार नाही, इंग्रजी तर नाहीच नाही. त्यामुळे मग फालतू अभ्यासक्रम देऊन विद्यार्थ्यांना पदव्या मिळाल्याचा खोटा आनंद आपण मिळवून देतो. ग्रामीण भागाचा असा पुळका येणाऱ्यांच्या हे लक्षातही येत नाही की, आपण जवळपास दोन वेगवेगळ्या शिक्षणपद्धतींची मागणी करतो आहोत. एक फालतू पदव्या देणाऱ्या दुकानांना परवानगी देणारी शिक्षणपद्धती आणि दुसरी अभिजनांसाठीची राखीव अशी गुणकौशल्याधारित शिक्षणपद्धती. अशा विषम व्यवस्थेतून मराठी समाजाचं भलं होण्याऐवजी त्याच्यातल्या चिरफळ्या आणखीनच ठळक होतील, याच्याकडे दुर्लक्ष केलं जातं.

इंग्रजीबद्दलचा दुरावा आणि त्यापोटी आणला जाणारा मराठीचा खोटा कळवळा हे महाराष्ट्राच्या रडगाण्यातलं एक मोठं गुंतागुंतीचं कडवं आहे. शालेय शिक्षणातलं इंग्रजी माध्यम, इंग्रजी भाषा शिकणं आणि उच्च शिक्षणातलं इंग्रजीचं स्थान या मुद्यांबद्दल आपल्याला अजून निश्चित भूमिका घेता आलेली नाही. बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळाने सातवीपर्यंतच्या शिक्षणातून इंग्रजी हद्दपार केली होती. आज सगळ्याच शिक्षणातून इंग्रजी हद्दपार झालेली आहे! एकीकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि दुसरीकडे मराठी माध्यमात शिकणाऱ्यांचं इंग्रजीविषयीचं भीतियुक्त अज्ञान अशा विद्रूप विसंगतीत मराठी समाज सापडला आहे.

अर्थातच मराठीच्या रडगाण्याच्या नियमाप्रमाणे या परिस्थितीलाही राष्ट्रीय धोरण, जागतिक परिस्थिती, बाहेरून येणारे परप्रांतीय वगैरे मुद्दे जबाबदार आहेतच, पण मराठी समाजाला स्वतःला या गुंत्याबद्दल काही ठरवता येत नाही, हेच खरं. इंग्रजी सुधारण्या–शिकण्याचे कोणतेही प्रयत्न सुरू केले की, आपल्याला मराठीची आठवण येऊन हुंदका येतो, पण खुद्द मराठीसाठी काही करायच्या वेळेला मात्र सगळा नाकर्तेपणा असतो.

अगदी टेलीव्हिजनवरच्या मराठी मालिका घेतल्या तरी त्यांच्यात बरेच इंग्रजी शब्द एखाद्या मराठी क्रियापदाने जोडलेले असतात. वर्तमानपत्रांमध्ये वाईट मराठी आणि बेगडी इंग्रजी यांची बेंगरूळ गोधडी तयार केलेली असते. टाइम्स गटाने मराठी वर्तमानपत्र काढलं तेच मुळी टाइम्सच्या नावानं ठळक इंग्रजी कुंकू लावून. आता जमाना आलाय, तो मराठी वर्तमानपत्रांच्या इंग्रजी नावानं निघणाऱ्या पुरवण्यांचा. त्यामुळे लोकमतचं ‘हॅलो’ चालतं तर लोकसत्ताची ‘व्हीव्हा’ पुरवणी असते. तिच्यातले विषयही ‘रिलेशनशिप’, ‘एटिकेट’, ‘फिटनेस’ असे असतात. ‘सकाळ’च्या पुणे आवृत्तीचं नाव सकाळ टूडे! यांनी शेतकऱ्यांसाठी नियतकालिक काढलं ते ‘ॲग्रोवन.’ यातलं ‘वन’ म्हणजे नंबर एक की आपलं मराठी वन ते त्यांचं त्यांनाच माहित!

मुद्दा अर्थातच नुसता नावांचा किंवा शीर्षकांचा नाही. त्याबरोबर येणाऱ्या आशयातून मराठीचा खरा बेंडबाजा वाजतो. बहुतेक मराठी वर्तमानपत्रं ही वाचनीयपेक्षा प्रेक्षणीय बनवण्यावर भर असतो. मजकुरापेक्षा जाहिरातीच जास्त आकर्षक असतात. दीडशे शब्दांची पुस्तक परीक्षणं आणि साडेसातशे शब्दांचे लेख म्हणजे वर्तमानपत्रांचं विचारवैभव. मथळ्याच्या जागी जाहिराती आल्याच आहेत, आता खुद्द संपादकीयाच्या जागीसुद्धा जाहिराती आल्या की, संपादक बिचारे सुटले. ‘केस गळायचे थांबतात आणि झोपही छान लागते’ या चालीवर ‘वाचून पटकन होतो आणि रद्दीही खूप जमते’ अशी कोणत्याही पेपराची जाहिरात करता येईल, अशी स्थिती आहे!

**शोभेचा ग्रंथव्यवहार आणि संमेलनांतील रडगाणी**

नाही म्हणायला मराठीत पुस्तकं मुबलक छापली जातात. मराठीचा धर्म म्हणून प्रकाशक अर्थातच रडत असतात. त्यांचं रडणं हे चांगली पुस्तकं नाहीत यासाठी नसतं, तर पुस्तकं चांगली खपत नाहीत म्हणून असतं. मात्र गावोगाव पुस्तक प्रदर्शनं भरतात, बरेच वेळा लोक प्रदर्शनांना जातातही आणि काही वेळा तर पुस्तकं विकतही घेतात. मात्र पुस्तकांची दुकानं तशी एकूण ओसच पडलेली असतात. शालेय क्रमिक पुस्तकं विकणारी दुकानं जर सोडली, तर बाकी पुस्तकांच्या दुकानांत शांतताच असते.

मात्र पुस्तकं ‘पाहाणं’ हे प्रतिष्ठेचं एक लक्षण मानणारी कुटुंबं शहरांमध्ये संख्येने वाढताहेत आणि शिवाय मराठीपणाची जाणीवही त्यांच्यात असतेच. पण मुलं शिकत तर इंग्रजी माध्यमात असतात. त्यांच्या खास सोईसाठी शहरांमध्ये आकर्षक द्विभाषिक पुस्तकांची दुकानं आता होऊ लागली आहेत. अशा सुजाण पालकांची मुलं अर्थातच स्मार्ट असतात. त्यामुळे पुस्तकाच्या दुकानातच बर्गर, कॉफी आणि मुलांची खेळणीसुद्धा असतात. एवढं सगळं करून पुस्तकावर किती कमाई होते आणि त्यातही मराठी पुस्तकांवर किती कोणास ठाऊक.

शहरी उच्च मध्यमवर्गाला लागणारी पुस्तकं दिवाणखान्यात ठेवण्यासारखी भारदस्त आणि शोभेची असावी लागतात. त्यामुळे देखणी आणि दिवाणखानी सरंजामाची (कॉफी–टेबल) पुस्तकं आता मराठीत निघायला लागली आहेत. ती वाचण्यापेक्षा

पाहण्या (दाखवण्या?)साठी जास्त असतात. पुस्तकांचा दुसरा खपाऊ प्रकार म्हणजे सामान्यज्ञान, पाककला, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाची पुस्तकं. ही पटकन पाहून मराठी आहेत की इंग्रजी की हिंदी हे कळत नाही. त्यांचा खप मोठा कारण त्यांना एक उपयुक्तता मूल्य असतं. पूर्वी एकूण वाचनातून व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हायचा (म्हणे). आता व्यक्तिमत्त्व विकास, तणाव–व्यवस्थापन अशी पुस्तकं वाचून पुढे जाण्यासाठी लगबग चालते. त्याच्या जोडीला ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र वगैरे आधुनिक 'शास्त्रां'ची पुस्तकं असतातच. अशा व्यक्तिमत्त्व विकासात फाडफाड कोकाटे, शिव खेडा, बालाजी तांबे, शिवराज गोर्ले वगैरेंची पुस्तकं फारच कामी येतात. भरीला जपानी कागदकला वगैरेंची पुस्तकं असली की, दिवाणखान्यातली शोकेस छान सजते.

ग्रामीण भागांतल्या तरुणांना कुतूहल असतं, झेपेल–समजेल एवढं वाचायचं असतं, पण त्यांना एकतर ही मध्यमवर्गीय पुस्तकं वाचावी लागतात किंवा निव्वळ प्रचारकी अशा पुस्तिका. कोणतीही प्रकाशन संस्था सर्वसामान्य (बिगरतज्ज्ञ) पण जिज्ञासू वाचकासाठी योजनाबद्ध पद्धतीने पुस्तकं काढीत नाही. अगदी निरलसपणे चळवळीची पुस्तकं काढणारेसुद्धा फार विचार न करता 'आपल्या' चळवळीची पुस्तकं छापीत राहतात. विज्ञान, इतिहास, समाजविज्ञान या क्षेत्रांतले पाच–पंचवीस विषय ठरवून त्यावर पुस्तकं काढायची, असं केलं जात नाही. त्यामुळे वाचायची इच्छा असणाऱ्यांना 'हे वाचा' असं सांगण्यापेक्षा 'हे वाचू नका' असं सांगण्याचीच गरज निर्माण होते.

आता हल्ली भाषांतरांबद्दल थोडंफार बोललं जातं. काही प्रकाशक तर फक्त भाषांतरंच छापण्यासाठी प्रसिद्ध आहेत. पण भाषांतर करताना चौफेर विवेक गरजेचा असतो. अगदी सुमार रहस्यकथांचीसुद्धा भाषांतरं कौशल्याने व्हावी लागतात. 'केला करार आणि छापलं भाषांतर' अशा वेगामुळे मराठीचं नुकसानच जास्त होतं. सामाजिक शास्त्रांमध्येसुद्धा खूप वेळा भाषांतराचा पर्याय सुचवला जातो, पण तिथेही सरसकट भाषांतरं करणं शहाणपणाचं नाही. मूळ पुस्तक कोणासाठी (कोणत्या वाचक वर्गासाठी) लिहिलं आहे, भाषांतर कोणासाठी केलं जात आहे, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. मराठी ग्रंथव्यवहारात या मुद्यांची चर्चा सहसा केली जात नाही आणि ते मराठीच्या एकूण मर्यादित कुवतीला साजेसंच आहे. पुन्हा, या सगळ्या भाषांतर–व्यवहारातही भारतीय भाषांमधून भाषांतर होण्याचं प्रमाण अगदी मर्यादित. मुख्यतः इंग्रजी 'बेस्ट सेलर्स'ची मराठी भाषांतरं करण्यावरच भर जास्त असतो आणि काही अपवाद सोडले, तर मराठीतून इतर भाषांमध्ये भाषांतर होण्याची उदाहरणं आणखीनच मर्यादित असतात. त्यामुळे मराठीत आजकाल होणारी भाषांतरं ही सकस आणि निरोगी भाषाव्यवहारापेक्षा मराठीतल्या एकूण कल्पनादारिद्र्यापोटीच होतात की काय, असं वाटण्यासारखी एकूण परिस्थिती आहे.

या कल्पनादरिद्र्याचा डंका पिटण्यासाठी साहित्य संमेलनं होतात. मराठी साहित्यिक, मराठी प्रकाशक आणि मराठीचे प्राध्यापक यांनी एकत्रितपणे रडण्याचा आणि अधूनमधून ओरडण्याचा सोहळा म्हणजे साहित्य संमेलनं. कित्येकदा हे संमेलन म्हणजे मराठीच्या प्राध्यापकांची परिषदच असते. राजेंद्र बनहट्टी या संमेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी अध्यक्षीय भाषणातूनच अशी मागणी केली की, सर्व शाखांच्या पदवीपर्यंतच्या अभ्यासात मराठी हा एक सक्तीचा विषय असावा! खरोखरच असं झालं, तर मराठीच्या प्राध्यापकांची गर्दीच गर्दी होऊन जाईल. खूप लोक मराठीचे प्राध्यापक झाले की, मराठी संस्कृती दणकट होईल, असा बनहट्टींचा हिशेब असणार. इतपत कल्पनादारिद्र्य असणारी संस्कृती आक्रसणार हे काय वेगळं सांगायला पाहिजे?

या स्थितीचं वर्णन करायला अशोक केळकरांनी वापरलेला 'लुळीपांगळी गरिबी' हा शब्दप्रयोग अगदी चपखल ठरावा. केळकरांनी मराठी भाषाव्यवहाराच्या संदर्भात 'लुळीपांगळी श्रीमंती' (पंडिती भाषावैभव) आणि 'धट्टीकट्टी गरीबी' (टिळक–फुले वगैरेंची आशयाचा वेध घेणारी साधी मराठी) अशा दोन परंपरा मानल्या आहेत. पण केळकरांच्या मते खरा धोका आहे, तो 'लुळ्यापांगळ्या' गरिबीचा. म्हणजे भाषावैभवही नाही आणि विचारवैभवही नाही! गेल्या पाच–सहा दशकांमध्ये मराठीची वाटचाल बहुतेक सगळी या लुळ्यापांगळ्या गरिबीच्या दिशेनेच झाली.

एकूण सगळा मामला भावगीतं ते चारोळ्या एवढाच आहे. एकेकाळी महाराष्ट्र भावगीतांवर डोलायचा. इतका तोकडा भावाविष्कार हा ज्या समाजाचा भावनिक खुराक असेल त्याला पुढे चारोळ्या म्हणजेच कविता वाटून समाधानाचे ढेकर येऊ लागले, यात काय विशेष? तीच गत विनोदाची. महाराष्ट्राला विनोद हाताळता येतच नसावा. त्यामुळे अत्र्यांचे अर्वाच्य विनोद आणि पु.लं.चा भावव्याकुळ विनोद या पलीकडे सामाजिक भाष्य म्हणून विनोदाचा वापर करणं, ढोंगांच्या खपलीमागची सामाजिक घाण उघड करण्यासाठी विनोद वापरणं, हे मराठी माणसाला काही जमत नाही.

**वाद आणि तत्त्वबोध दोन्हींचा आनंद!**

विनोद जमणं, समजणं आणि पचणं सगळंच तसं अवघड, पण एरवीही महाराष्ट्राला सरळसोट वैचारिक चर्चेचंदेखील वावडंच आहे. भांडणतंटे आणि आरोप प्रत्यारोप थोडेफार केले जातात, पण त्यांना एकतर वैयक्तिक बाजू असते, नाहीतर कंटाळवाण्या परिसंवादाची अवकळा असते. मुद्यांच्या खणाखणीपेक्षा शाब्दिक कर्कशपणा जास्त असतो. दोन परस्परविरोधी छावण्यांमध्ये वाद झडलाच, तर त्यात हेत्वारोप आणि अहंकारच जास्त असतो. जास्त कडाक्याचे वाद आपल्या–आपल्यातच जास्त होतात! त्यातही कार्यकर्त्यांमध्ये वादांची हिरिरी थोडीतरी असते. अभ्यासकांमध्ये वाद, चर्चा, संवाद यांतलं काहीच होत नाही. नेमाडे आणि त्यांच्या दोस्तमंडळींच्या टीका करण्याच्या शैलीचं मागे विद्याधर पुंडलिकांनी 'मुटका' संस्कृती असं वर्णन केलं होतं. म्हणजे आजूबाजूला पाणी जास्त उडेल, अशा पद्धतीने पाण्यात उडी मारायची! पण आता महाराष्ट्रात वादांची 'गुटका' संस्कृती प्रचलित आहे. प्रत्येकाच्या तोंडात अपेक्षांचा गुटका (बऱ्याचजणांच्या तोंडात खरासुद्धा असतोच!) त्यामुळे तोंड उघडायची चोरी. साहजिकच आहे; कशाला कुणाबद्दल बोलायचं? कोण कोणत्या पुरस्कार समितीवर असेल काय भरोसा? फक्त स्तुती तेवढी करावी.

वैचारिक आणि सार्वजनिक क्षेत्रांतल्या वादांची चर्चा करायला लागलं की, पुन्हा अनेकांना आचार्य अत्रे आठवतील. त्यांच्या वादांमध्ये अर्वाच्यपणा जास्त आणि वैचारिकता कमी असायची. अत्रे हे महाराष्ट्राचं एक दैवत. त्यामुळे त्यांच्या अर्वाच्यपणाचा प्रभाव पडला नसता तरच नवल. पुढे त्यांचा वारसा अर्वाच्यपणाच्या बाबतीत बाळासाहेब ठाकरेंनी चालवला. या प्रकारच्या आक्रमकतेमध्ये खाजगी कुलंगडी, शारीरिक व्यंगं, यांनाच मुद्यांपेक्षा जास्त महत्त्व राहिलं.

दुसऱ्या वादांची आठवण निघेल ती फडके (ना.सी.)–खांडेकर यांच्या वादाची. पण ह्या वादाचं वळण आणि पातळी एकूण बाळबोध आणि ९ वी ब च्या निबंधांची होती. य.दि.फडके हे परखडपणासाठी प्रसिद्ध. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग केले. पण त्यांच्या पद्धतीने एकदा का नेमकं (अचूक) वास्तव काय आहे, हे त्यांनी दाखवून दिलं की गप्प बसण्याखेरीज प्रतिपक्षापाशी काय उरतं? तरीही त्यांनी जेव्हा जेव्हा इतिहासाचा काहींना न पटणारा अन्वयार्थ लावला, तेव्हा 'किती झालं तरी ते 'फडके' आहेत' अशी त्यांच्या जातीची आठवण देणारी अश्लाघ्य कुजबूज जातिवंत पुरोगाम्यांनी केलीच. सोईचे असतील तेव्हा फडके हे जातीपलीकडे गेलेले अभ्यासक, ते गैरसोईचे होतील तेव्हा त्यांना त्यांच्या जातीत गाडून टाकायचं. या पद्धतीमुळे चर्चा पुढे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

मे.पुं.रेगे आणि गोविंद तळवलकर हे एकेकाळी महाराष्ट्रातले नरभक्षक म्हणून प्रसिद्ध होते. त्यातही तळवलकर वाद घालतात म्हणजे पुस्तकं किंवा त्यातले उतारे अंगावर फेकतात असा भास होतो. रेग्यांच्या वादशैलीतही अनेक वेळा आक्रमकताच जास्त असायची. पुन्हा या दोघांचीही काही दैवतं होती/आहेत आणि त्यांच्याबद्दल इतरांनी काही म्हणायचं, हे त्यांना पटणारं नाही. रेग्यांच्या तर आसपासही भोंगळ वगैरे लिहिणारे लोक होतेच, पण त्यांची तलवार या स्नेहीमंडळींवर कधी चालली नाही. तरीही वाद चालवण्याचं, त्याच्यातून काही मुद्दे पुढे रेटण्याचं आणि सार्वजनिक चर्चाविश्व जिवंत ठेवण्याचं श्रेय त्यांना द्यायलाच हवं. मात्र म.अ.मेहेंदळे आणि शरद पाटील यांच्यातील चर्चेने जी उंची गाठली, ती रेगे–कसबे, रेगे–बारलिंगे किंवा अलीकडचा तळवलकर–मोरे या वादांनी गाठली नाही.

फुले–आंबेडकरी परंपरा ही आधुनिक महाराष्ट्रातली प्रतिवादाची एक अव्वल परंपरा म्हणून दाखवता येईल. त्यांच्या लिखाणाच्याच निमित्ताने १९८० नंतरच्या काळात मोठी वादंगं उभी राहिली. विशेषतः फुल्यांचं खंबीरपणे समर्थन करण्यासाठी हरि नरके हिरिरीने उतरले आणि त्या सार्वजनिक वादपरंपरेचं क्षणिक पुनरुज्जीवन झालं. 'य.दि.फडक्यांच्या संशोधनाच्या ट्रकमागून जाणाऱ्या नरकेंना वादाची वाट सोपी गेली' असं तेव्हा कुणीतरी गमतीनं म्हटलं होतं, पण नरकेंना भारी घाई (नावच हरि!). त्यामुळे हिंदी सिनेमातल्या हीरोसारखी त्यांची मोटरसायकल फडक्यांच्या ट्रकवरून उडी मारून पुढे गेली. परिणामी नरके हे महात्मा फुल्यांचे 'ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी' बनले.

दलित पँथर्सच्या उदयाच्या काळात महाराष्ट्राच्या पांढरपेशा संस्कृतीवर घणाघाती टीका झाली. त्यातून एका नव्या सांस्कृतिक उठावाची चाहूल लागली, पण हा उठाव अगदी अल्पावधीतच खाली बसला. आता उरली ती एक फुटकळ चर्चा. तिचा विषय काय, तर दलित साहित्याला 'दलित साहित्य' म्हणावं की 'आंबेडकरी साहित्य' म्हणावं हा. जे दलित सांस्कृतिक चळवळीच्या बाबतीत घडलं, ते महाराष्ट्राच्या एकूण वैचारिक वातावरणाचंच वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे सुरुवातीला बऱ्याच शक्यतांचं सूचन करणारी सुचिन्हं येतात आणि पुढे त्या शक्यतांची परिपूर्ती मात्र होत नाही. त्यामुळे परखड, चमकदार वगैरे लिखाण जन्माला येतं आणि नंतर मध्यम दर्जापाशी ते थांबतं.

उदाहरणार्थ, रावसाहेब कसबे यांच्या 'मार्क्स आणि आंबेडकर' या पुस्तकाने गंभीर आणि धाडसी विषयाला हात घातला, पण त्यात धाडसाने गंभीर वैचारिक चिकित्सेवर मात केली. पुढे तर रावसाहेब कसबेंनी सावरकरांवर लिहिलं ते एकदम आम मराठीला साजेसं, भुसभुशीत. बारीक तपशिलांसह लिहिण्यासाठी शेषराव मोरे प्रसिद्धी पावले; त्यांना 'राजहंस' पावला; हे खरं, पण तपशील आणि निष्कर्ष यांचा संबंध तपासण्याची शेषरावांनी फारशी फिकीर ठेवली नाही. तरीही ते विद्वान मराठी लेखक म्हणून मान्यता पावलेच. असेच तपशिलांच्या घोड्यावर स्वार होऊन फिरणारे दुसरे मोरे म्हणजे सदानंद मोरे. गेल्या दहा वर्षांमधल्या महाराष्ट्रात बोकाळणाऱ्या आक्रमक आणि असहिष्णु इतिहास लेखनाच्या लाटेपासून सदानंद मोरे दूर राहिले, पण त्यांचा मुख्य आविर्भाव 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' या धाटणीचा. त्यामुळे सामाजिक इतिहासाच्या मांडणीच्या दारापाशीच (अजून तरी) ते घुटमळताना दिसतात. या तिन्ही उदाहरणांमध्ये एक साम्य आहे. वर म्हटल्याप्रमाणे वैचारिक चर्चेला हात घालण्याचं धाडस आहे, पण त्या चर्चेला पुरेशी उंची देण्यात मात्र हे प्रयत्न अपुरे पडतात. आणि तरी नाव घ्यायचं झालं, तर ह्यांचंच घ्यावं लागतं, हे महाराष्ट्राच्या मर्यादेचं निदर्शक आहे.

संस्थात्मक प्रयत्न असोत की व्यक्तिगत कामगिरी असो, उंच उडी मारण्याची महत्त्वाकांक्षा बरेच वेळा बोथट कामगिरीमुळे झाकोळून जाते. आखुड विचारविश्वामुळे थोडक्या कर्तबगारीवर धकून जातं हे तर खरंच; पण अनेक वेळा सामाजिक दडपण

आणि तथाकथित परिवर्तनवादी राजकारणाची हौस यांच्यामुळेसुद्धा कर्तबगारीचे वारू भलत्या दिशेने उधळतात.

मराठी सांस्कृतिक विश्वाच्या आखुडपणाने घेतलेला या प्रकारचा दुर्दैवी बळी म्हणजे आ.ह.साळुंखे. समतावादी तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा करीत असतानाच सामाजिक व्यवहारांची सजग चिकित्सा करणाऱ्या साळुंखेंनी एका टप्प्यावर मराठा समाजातल्या बुद्धिजीवींची झडती घेतली होती. तेच साळुंखे आक्रमक भावनिकतेचं राजकारण करू पाहणाऱ्यांच्या गोटात डेरेदाखल झाले. नवब्राह्मणेतरवादाच्या आधारे बहुजनांचं नेतृत्व करू पाहणाऱ्यांना साळुंख्यांचा आधार मिळाला, पण शिवधर्माच्या तात्कालिक वावटळीनंतर ना समतावादाला बळ मिळालं ना मराठी समाज एकरस व्हायला हातभार लागला.

**प्रश्नमालिका**

मराठी सांस्कृतिक व्यवहारांच्या ह्या एकूण सार्वत्रिक आखुडपणाची चिकित्सा कशी करायची? (खुद्द सदर लेखक त्या आखुड विश्वाचाच भाग असल्यामुळे तर हे काम जास्तच जिकीरीचं आहे.)

आपलं 'स्वत्व'–आपलं खास वेगळेपण कशात आहे, याबद्दल मराठी समाज स्वतःच गोंधळात पडलेला दिसतो. आपल्या अस्सल वारशाबद्दल संदेह निर्माण झाल्यामुळे एकतर फुटकळ फापटपसाऱ्याचा भार मराठी समाज वाहू लागला किंवा तो वारसा टिकवून वृद्धिंगत करण्यात कमी पडला. त्यामुळे मराठी समाजाच्या एकूण मरगळीची चिकित्सा करायची म्हटली की, प्रश्नांची एक मालिकाच पुढे येते.

पेशवाईपासून पोसलेल्या अप्पलपोट्या अभिजनांच्या खुजेपणामुळे मराठी संस्कृतीचे पाय कापले गेले का? सांस्कृतिक अभिजन आणि मराठी समाज यांच्यातली दरी त्या ऐतिहासिक काळातच साकारली का?

पुढे वासाहतिक काळात या अभिजनांचा गोंधळ उडून परंपरा आणि आधुनिकता यांच्या धुमश्चक्रीत परंपरेऐवजी सांस्कृतिक जिवंतपणाचाच त्याग केला गेला का? आधुनिक दृष्टी प्रस्थापित होण्याऐवजी जुनाच दंभ आधुनिकतेच्या आवरणात वावरू लागला का?

मराठी मध्यम वर्गाच्या अलिप्त आणि स्वयंकेंद्री जीवनशैलीमुळे मराठी भाषेचा प्रश्न व मराठी संस्कृतीचा प्रश्न एकूण सार्वजनिक जीवनापासून तुटून ते फक्त सुटे–सुटे भाषा व संस्कृतीविषयक प्रश्न बनले का? मराठी समाजाचं सांस्कृतिक विश्व नेहमीच स्वतःला स्वायत्त मानून वावरत राहिलं का?

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राजकीय सत्ताव्यवहार आणि सांस्कृतिक सत्ताव्यवहार यांची पूर्ण फारकत होऊन राज्यकर्त्यांकडे आश्रयदात्यांची भूमिका आली का? या फारकतीमुळे सांस्कृतिक सत्ताव्यवहार जास्त संकुचित व आत्मकेंद्री बनले का?

दीर्घ काळापासून किरट्या अर्थव्यवस्थेत मराठी समाज वावरत राहिला. त्यामुळे आपला सांस्कृतिक परिसर उजाड माळरानासारखा रखरखीत बनला का? सहकारी संस्थांच्या रूपाने संपन्नतेची काही क्षणिक बेटं तयार होताच आश्रितभावाला चटावलेले सांस्कृतिक अभिजन या बेटांभोवती जमले. पण आश्रितांच्या आधाराने संस्कृती कशी वाढणार? त्यामुळे मराठी संस्कृती जास्तच बटबटीत बनली का?

'मराठा तेतुका मेळवावा...' असं म्हटलं जातं. पण गेल्या शे–दोनशे वर्षांकडे नजर टाकली, तर मराठी समाज एकत्र मेळवण्याचा कार्यक्रम कधी राबवला गेला? सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक (प्रादेशिक) चिरफळ्यांमध्ये मराठी समाज नेहमी विखंडित राहिला आहे. अर्थातच त्यामुळे 'महाराष्ट्र धर्म' म्हणजे काय याचं उत्तरही कधी एकसूत्री राहिलेलं नाही. अशा विखंडिततेच्या पार्श्वभूमीवर, आधीच एकरस नसलेल्या मराठी समाजात ग्रामीण भागाची कोंडी आणि शहरांमधली अनामिक विपन्नता यांच्यामुळे मराठी संस्कृतीची मरगळ जास्तच तीव्र बनते का?

बहुधा या सगळ्याच प्रश्नांची उत्तरं थोड्याफार फरकाने होकारार्थी आहेत. तसं असेल तर महाराष्ट्राचा सांस्कृतिक आखूडपणा हा काही गेल्या पाच–पन्नास वर्षांचाच मुद्दा राहणार नाही, पण या प्रश्नांची उत्तरं शोधण्याऐवजी – इतकंच काय, पण ते प्रश्न विचारण्याऐवजी आपल्यावर अन्याय होतोय, अशा समजुतीत मराठी मन समाधान मानून घेतं.

मराठी समाजाचं एकंदर भौतिक दारिद्र्य आणि इथल्या पांढरपेशा मध्यमवर्गाचं वैचारिक दारिद्र्य यांची जोडी जमल्यामुळे मराठीसाठी धडपडणं म्हणजे शक्य तेवढ्या थिल्लर उपायांच्या पिपाण्या वाजवणं, असा सांस्कृतिक कार्यक्रम महाराष्ट्रात नेहमी रंगतो.

यातूनच मग, कधी इंग्रजीचा दुस्वास कर, तर कधी इंग्रजी शब्दांचे खडतर संस्कृतप्रचुर पर्याय शोध; कधी इंग्रजी हद्दपार करून पुढच्या पिढ्यांच्या पायांवर धोंडा पाड, तर कधी रद्दड इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतरांवर पोट भर; राज्य सरकारपुढे हात पसरून संस्था, पदं आणि अनुदानाची खिरापत माग, तर कधी अनिवासी भारतीयांच्या खैरातीने मराठीवरचं ग्रहण सुटेल म्हणून 'दे दान...' म्हणत गळे काढ; कधी मराठीतून पाट्या असाव्यात म्हणून भांडण्याचं शौर्य दाखव, तर कधी मराठी कोणाला म्हणायचं याचा काथ्याकूट कर... अशा एक ना अनेक उपायांमध्ये मन गुंतवून मराठी माणूस आपलं मराठी दुःख हलकं करीत राहतो.

◆

**सुहास पळशीकर**
राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ,
पुणे–४११ ००७.
फोन : ०२०–२५६९०८१५